रे.दि.मु.नं.१८९/२०१६ मधील नि.६४ वरील आदेश
**(शंकर ससे, वगैरे वि. निवृत्ती चोरमाले,वगैरे)**
**CNR NO.MHST050005782016**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी आदेश ६ नियम १७ अन्वये कैफियतीमधील दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे -

वादीने सदरचा दावा हा प्रतिवादींचे विरुध्द निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी यांनी नि.१८ ला दि.१४.०६.२०१६ रोजी कैफियत दाखल केली आहे. सदर कैफियतीमध्ये प्रतिवादी यांना मुळ दावा मिळकतीबाबत, त्यांचे पुर्व हक्कदार यांचेपासूनचा वारसा हक्क हितसंबंध इत्यादी बाबतची हकिकत कैफीयत मध्ये नमूद करणे आवश्यक झालेले आहे असे कथन केले. सदर दुरुस्तीमुळे कैफीयतीचे स्वरुपात बदल होत नाही. त्यामुळे प्रतिवादींनी अर्जात नमूद केलेप्रमाणे कैफीयतीमध्ये दुरुस्ती करण्यात यावी म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. वादींनी प्रस्तुत अर्जास नि.६६ ला म्हणणे देवून अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे. वादी व प्रतिवादींचा पुरावा बंद होवून दावा अंतीम युक्तीवादावर नेमलेला असताना प्रतिवादींनी दि.२३.०१.२०२५ रोजी कैफीयत दुरुस्तीचा अर्ज दाखल केला आहे. सदर दुरुस्ती अर्जात नमुद केलेली कारणे कायदेशीर नाहीत. केवळ दाव्यास विलंब व्हावा या हेतूने प्रतिवादींनी सदर अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचून पाहिले. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकले.

५. वादींनी त्यांचे कथनांच्या पृष्टयर्थ खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे.-

i) Chhabubai Haribhau Badakh Vs. S.H.Khatod, Laws (Bom) 2009 5 23.

ii) M. Revanna Vs. Anjanamma (Dead) By Lrs. And Others, Laws (SC) 2019 2 59.

iii) South Konkan Distilleries Vs. Prabhakar Gajanan Naik & Ors., AIR 2009 Supreme Court 1177.

६. प्रतिवादींनी त्यांचे कथनांच्या पृष्टयर्थ खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे.-

i) Life Insurance Corporation of India Vs. Sanjeev Builders Private Limited and another, AIR 2022 Supreme Court 4256.

ii) Krishnaji Shankar Moghe Vs. Sitaram Gangadhar Shende, 2003(1) Mh.L.J. 233.

iii) Quality Polly Closures Vs. Executive Engineer, M.S.E.B., Satara, 2000(4) Mh.L.J. 203.

७. वादी व प्रतिवादींनी दाखल केलेले न्यायनिर्णय वाचले. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यावरुन असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा हा वादींनी निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी दावा अंतीम युक्तीवादावर नेमलेला असताना प्रस्तुतचा कैफीयत दुरुस्तीचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादींनी दाखल केलेले न्यायनिवाडे येथे लागू होत नाहीत. दुरुस्ती अर्जास कोणतेही संयुक्तीक कारण घडलेले नाही. सदरचा दावा अंतीम युक्तीवादाकरीता नेमण्यात आलेला आहे. दुरुस्ती करणेस कोणतीही घटना घडलेली नाही. प्रतिवादी मागत असलेली दुरुस्ती ही दावा गुणदोषावर चालण्यास आवश्यक आहे असे दिसून येत नाही. दुरुस्ती करणेस इतका विलंब का झाला याचे कोणतेही संयुक्तीक कारण अभिलेखावर नाही. प्रतिवादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, दुरुस्तीच्या बाबतीत न्यायालयाने उदारमतवादी दृष्टीकोन ठेवला पाहिजे. परंतु वर नमूद केल्याप्रमाणे सदरचे प्रकरण अंतीम युक्तीवादाकरीता आहे. दुरुस्ती करणेस कोणतेही संयुक्तीक कारण घडलेले नाही तसेच सदरची दुरुस्ती दावा गुणदोषावर चालणेकरीता आवश्यक वाटत नाही. दुरुस्ती मंजूर झालेस

प्रकरण लांबणार आहे व नामंजूर झालेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

JYOTI JAGNNATH MANE
Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2025.05.08 16:25:55 +0530

ठिकाण -कराड (जे.जे.माने)
दिनांक ०८/०५/२०२५ ४ थे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड